


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६९०. वा | रविवार | दि. २५ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# वाघ दातामुळे जिल्ह्याचा टायगर संकटात...

# आमदार संजय गायकवाड यांच्यावर वनविभागाकडून गुन्हा दाखल

## बयाण नोंदवून वाघाचा दात वस्तू प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविला



**जनसंचलन/ बुलढाणा**

आ.संजय गायकवाड यांचा वाघाच्या दातांवर चर्चा करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिव-सेनेचे आमदार संजय गायकवाड यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. या व्हिडिओत त्यांनी गेल्या ३७ वर्षांपूर्वी वाघाची शिकार केली आणि त्याच वाघाचा दात माझ्या गळ्यात असल्याचे त्यांनी दावा केला आहे. या व्हिडिओने महाराष्ट्राच्या राजकारणात ठिणगी पडण्याची शक्यता आहे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये आ.गायकवाड यांनी गळ्यात एका जनावराचा दात घातल्याचे दिसत आहे. या दाताबद्दल त्यांना विचारले असता ते म्हणाले की, हा दात वाघाचा आहे. मी १९८७ मध्ये एका वाघाची शिकार केली होती. त्याच वाघाचा हा दात आहे. हा व्हिडिओ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या दिवशीचा असल्याचे बोलले जात आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटाचा मुखपत्र असलेल्या सामना च्या ट्विटर हँडलवरून हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ लागू झाल्यानंतर अधिकृतपणे बंदी घालण्यात आली. भारतात वाघांच्या शिकारीवर १९८७ पूर्वीच बंदी घालण्यात आली. वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२ मध्ये वाघांना आययूसीएनच्या धोक्यात आलेल्या प्रजातींच्या लाल यादीत संकटग्रस्त म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. १९७२ मध्ये वन्यजीव (संरक्षण) कायदा लागू झाल्यानंतरच वाघांच्या शिकारीवर अधिकृत बंदी लागू झाली. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या अनु-सूची १ अंतर्गत भारतीय वाघाचे वर्गीकरण करण्यात आले. हा कायदा वाघांची शिकार, शिकार आणि वाघाची कातडी, हाडे आणि शरीराच्या अवयवांच्या व्यापारापासून संरक्षण प्रदान करतो. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांना पहिल्यांदा दोषी ठरल्यास तीन ते सात वर्षांचा तुरुंगवास आणि पन्नास हजार रुपयांपासून दोन लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे. त्यानंतर दोषी आढळल्यास किमान सात वर्षांचा तुरुंगवास आणि पाच लाख रुपयांपासून पन्नास लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

---

# समृद्धीवर ट्रकचा भीषण अपघात,चालक ठार

## बॅरिकेड्सला धडकल्याने ट्रकने घेतला पेट ...



**जनसंचलन/मेहकर**

चालकाला डुलकी लागल्याने नियंत्रण सुटून भरधाव ट्रक बॅरिकेट्सवर धडकला. या अपघातानंतर रस्त्याच्या बाजूला उलटलेल्या ट्रकने पेट घेतला. यामध्ये चालकाचा होरपळून मृत्यू झाला तर क्लिनरसह अन्य एक गंभीर जखमी झाला. ही घटना समृद्धी महामार्गावर मेहकर तालुक्यातील फर्दापूरनजीक २४ फेब्रुवारी रोजी पहाटे घडली. एजाज शहा असे मृत चालकाचे नाव आहे. ट्रकचालक एजाज शहा (वय २२), वाहक सोहिल अली (वय १८), शकील शहा (वय ३२) हे ट्रक क्रमांक (एमएच ०४ -जेयू ६६२६) ने नागपूरहून मुंबईला जात होते. दरम्यान, फर्दापूरनजीक समृद्धी महामार्गावर ट्रक चालकाला डुलकी लागली आणि ट्रकवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रक बॅरिकेट्सला धडकला व उलटला, त्यानंतर क्षणार्धात ट्रकने पेट घेतला आणि आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामध्ये ट्रकचालक एजाज शहा याचा जागीच होरपळून मृत्यू झाला तर वाहक सोहिल अली व शकील शहा (रा. सर्व उत्तर प्रदेश) हे आगीत होरपळून गंभीर जखमी झाले आहेत. समृद्धी महामार्गावर ड्यूटीवर असलेले पोलिस निरीक्षक शैलेश पवार, पोलिस कर्मचारी राठोड, पीटकर यांनी जखमींना मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. पुढील तपास समृद्धी महामार्गाचे पोलिस निरीक्षक शैलेश पवार करत आहेत.

# मारहाण करून पैसे हिसकले; तिघांवर गुन्हा दाखल



**जनसंचलन/बुलढाणा**

ट्रकचालकास मारहाण करून त्याच्याकडून पाच हजार रुपये हिसकल्याची घटना २३ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. ट्रकचालक सय्यद तनवीर सय्यद शब्बीर रा. इंदिरानगर यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, कुणाल ऊर्फ भय्या भारत चव्हाण, सुमित ऊर्फ झुरळ अनिलसिंग ठाकूर, विजय जगन्नाथ पाटील सर्व रा. शिव-ाजीनगर, जुनगाव भिलवाडा यांनी दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, तनवीर सय्यद यांनी नकार दिल्याने तिघांनीही त्यांना मारहाण करून त्यांच्या खिशा-तून रोख पाच हजार रुपये काढून घेतले. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी तिन्ही आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लेखी आश्वासना नंतर दुसऱ्यांदा सरपंचाने उपोषण सोडले

## १५दिवसात काम पूर्ण न झाल्यास ठेकेदाराला काळ्या यादीत टाकणार

जनसंचलन/ सिंदखेडराजा

सिंदखेड राजा तालुक्यातील वाघजाई फाटा ते जळगाव या रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करा या मागणीसाठी वाघजाई सरपंच गजानन शिवाजी सानप तसेच ग्रामस्थांनी १९ फेब्रुवारीपासून आमरण उपोषण सुरू केले होते ते आज सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता काबरे यांच्या लेखी आश्वासनाने सोडले आहे वाघजाई ग्रामपंचायत कार्यालयात १९ फेब्रुवारी पासून बेमुदत उपोषणाला सुरुवात झाली. तत्पूर्वी २९ सप्टेंबर २०२३ बांधकाम विभागाकडून ग्रामपंचायतला रस्त्याचे अपूर्ण काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन मिळाले होते. मात्र या आश्वासनाची संबंधित विभागाकडून पूर्तता न झाल्याने वाघजाई सरपंच गजानन सानप यांनी बेमुदत उपोषण पुकारले. निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अभियंत्यावर योग्य ती



कार्यवाही व्हावी अशीही मागणी करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थ मंडळीं बेमुदत उपोषणास बसले आहेत.निकृष्ट दर्जाच्या झालेल्या कामाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अभियंत्यावर योग्य कार्यवाही व्हावी अशीही मागणी उपोषण दरम्यान करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की या लेखी आश्वासनात असे म्हटले आहे बांधकाम विभागाकडून ग्रामपंचायत कार्यालयास एम बी,व ईसटीमेट तुम्हाला तात्काळ देण्यात येईल. वरील भागण्या १५ दिवसात दिलेल्या मुदतीत पूर्ण न झाल्यास व कामाच्या दर्जात काही उणीव असल्यास मी. श्री. बि.एन. काबरे व उपविभागिय अभियंता एम. एस. भाले. देउळगाव राजा संबंधित ठेकेदाराचे लायसन्स काव्या यादीत टाकून त्यांचे लायसन्स कायमस्वरूपी रद्द करणे. नाही तर आपण आमच्या विरुद्ध न्यायालयात दाद मागण्यास आमची हरकत नाही, असे लेखी अश्वासन देत असल्याने संबंधित सरपंच यांनी उपोषण सोडले आहे आहे यावेळी ग्रामपंचायत सदस्य व समस्त गावकरी मंडळी मोठ्या संख्येने हजर होते

# मनोहर जोशी यांनी हिवराआश्रमला दिली होती भेट

जनसंचलन/हिवरा आश्रम

तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी हिवरा आश्रम येथील स्वामी विवेकानंद आश्रमास ५ फेब्रुवारी १९९७ रोजी भेट दिली होती त्यांच्या निधनामुळे आज या भेटीच्या आठवणींना उजाळा मिळाला यावेळी शुकदास महाराज यांच्याबरोबर तत्कालीन मुख्यमंत्री जोशी यांनी विविध विषयांवर छान चर्चा केली होती. विवेकानंद आश्रमात शिकविला जाणारा मूल्यशिक्षण हा विषय आम्ही शालेय शिक्षणात समाविष्ट करू अशी घोषणा त्यांनी त्यावेळी केली होती. त्यानंतर शालेय शिक्षणात मूल्यशिक्षण हा विषय समाविष्ट करून केलेल्या घोषणेची



पूर्तताही केली होती. संस्थेला भेट देऊन मन प्रसन्न झाले. हा तर आदर्श संस्थेचा आदर्श आहे. असा अभिप्राय नोंदवहीत लिहून दिला होता. तत्कालीन आ. प्रतापराव जाधव यांनी ही भेट घडवून आणली होती. शिक्षक, नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री ते लोकसभा अध्यक्ष असा प्रवास करणाऱ्या मनोहर जोशी यांना आश्रमातर्फे श्रद्धांजली अर्पण केली

# शिक्षकांच्या मागणीसाठी पालक आक्रमक...

जनसंचलन/ रुईखेड मायंबा

येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या मागणीसाठी शाळा व्यवस्थापन समितीने शाळा बंद करण्याचा इशारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना २० फेब्रुवारी रोजी निवेदनातून दिला आहे. रुईखेड मायंबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील दोन शिक्षक १५ डिसेंबर २०२३ आणि २० फेब्रुवारी २०२४ रोजी बदलून गेल्यामुळे शिक्षकांची दोन पदे रिक्त आहेत. त्यामुळे परीक्षा जवळ येत असताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. परीक्षेचा विचार करता वेळेत





शिक्षक येणे गरजेचे होते, पण तसे झाले नाही. त्यामुळे २४ फेब्रुवारीपर्यंत शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. शिक्षक मिळाले नाहीत तर २४ फेब्रुवारी रोजी शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा संदीप शिंदे, सिद्धेश्वर सोळंके यांनी दिला आहे.

# पोलिस असल्याची बतावणी करून वृद्धास लुटले...

जनसंचलन/ देऊळगावराजा

पोलिस असल्याचे बतावणी करून देऊळगावराजात एका ६७ वर्षीय कृषी केंद्र चालकास अज्ञात चोरट्याने लुटल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये संबंधितांकडी सोन्याची अंगठी व सोन्याची चेन, असा सुमारे ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला. देवेंद्र बाबुलाल जिंतूरकर (६७) हे आपल्या कृषी केंद्रावर जात असतांना २३ फेब्रुवारी रोजी अज्ञात व्यक्तीने त्यांना दुपारी साडेचार वाजेच्या सुमारास गाठले. सोबतच पोलिस असल्याची बतावणी करीत त्यांची दिशाभूल केली. तसेच त्यांच्याकडील अंगठी व सोन्याची चेन, असा ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल रुमालात बांधल्याचे भासवत तो लंपास केला. याप्रकरणी नंतर आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर याप्रकरणी त्यांनी पोलिसात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात



आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास देऊळगाव राजा पोलिस करीत आहे. दरम्यान, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाल्याचे चित्र आहे.

# विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी सासरच्यांवर गुन्हा दाखल...

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा : माहेरवरून दोन लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांनी २३ फेब्रुवारी रोजी सासरच्या चौघांविरुद्ध विविधा कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. अनुराधा शिवप्रताप सिंह चौहान रा. औसा, जि. लातूर ह. मु. गोडबोले ले आउट जाभरून रोड, बुलढाणा यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शिवप्रतापसिंह रमेशसिंह चौहान राजकांताबाई रमेशसिंह चौहान विश्वप्रतापसिंह रमेशसिंह चौहान, दीपाली विश्वप्रतापसिंह चौहान रा औसा यांनी माहेरवरून दोन लाख रुपये आणण्याची मागणी केली. ही मागणी पूर्ण न केल्याने त्यांनी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला. या प्रकरणी सासरच्या चौघांविरुद्ध



विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे हे.कॉ. सुनील किनगे करीत आहेत.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल (पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
• कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
• अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
• लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
• संधीवातावर उपचार
• गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
• फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
• मणक्यातील आजारावर उपचार
• दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
• कंबरेचे व मानेचे दुखणे
• पायातून व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# रस्त्यावरच्या लढाई बरोबरच राजकीय परिवर्तनाच्या लढाईत सहभागी व्हा - रविकांत तुपकर

जनसंचलन/ खामगाव

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आपल्या निर्धार परिवर्तन यात्रेला २२ फेब्रुवारी २०२४ रोजी खामगाव तालुक्यातील मांडका येथून प.पु. लक्ष्मणगिरी महाराजांचे दर्शन सुरुवात केली. बुलडाणा जिल्ह्याची मागास ओळख पुसण्याच्या निर्धार आपण केला असून त्यासाठी तुमच्या सर्वांच्या साथीची गरज, त्यामुळे या परिवर्तनाची तुम्ही मला साथ द्या जिल्ह्याचा चेहरा बदलून दाखवितो, असा निर्धार रविकांत तुपकरांनी यावेळी व्यक्त केला.

निर्धार परिवर्तन यात्रेला मांडका येथून सुरुवात झाल्यानंतर तालुक्यातील खुटपुरी, शिरजगाव दे., मातणी, गारडगाव, अंत्रज, हिवरखेड, नायदेवी, लोखंडा, निरोड, शिराळा, गणेशपुर, नागझरी, झोडगा, वझर या गावात गावकऱ्यांनी रविकांत तुपकरांचे जोरदार स्वागत केले, यावेळी तुपकरांनी सभा व बैठकांच्या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधला, तर रात्री उशिरा पाळा येथे झालेल्या सभेला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, मजूर, कष्टकरी, महिला आणि तरुणांच्या हक्काचे प्रश्न घेऊन, विकासाचे प्रश्न घेऊन आपण ही यात्रा जिल्ह्यातील प्रत्येक गावात घेऊन जाणार आहोत. जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात परिवर्तनाची आग आहे आणि त्याच परिवर्तनाचा निर्धार करण्यासाठी ही यात्रा आहे.



जिल्ह्यातील शेतकरी, कष्टकरी, तरुण अडचणीत आहेत. शेतमालाला भाव नाही, सिंचनाची सोय नाही, दुसरीकडे तरुणांसाठी रोजगार नाही. जिल्ह्यात मोठी एमआयडीसी नाही, प्रोजेक्ट नाहीत, यूपीएससी-एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी चांगले अभ्यासिका नाहीत, एकंदरीत नानाविध अडचणी या जिल्ह्यात आहेत, अनेक समस्या आहेत. या सर्व समस्या आणि अडचणी घेऊन आपण निर्धार परिवर्तन यात्रा काढत आहे. लोकसभेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी ही निर्धार परिवर्तन यात्रा आहे. गावभर मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता आता ही लढाई माझी एकट्याची नसून सर्वसामान्य जनतेने त्यांच्या खांद्यावर घेतली आहे. त्यामुळे जनतेच्या आशीर्वादाने आता लोकसभेत परिवर्तन घडणारच असा विश्वास देखील रविकांत तुपकर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी श्याम अवथळे, अनंदा अटोळे, नानाभाऊ खटके, दिपक पाटील-आढाव, श्रीकृष्ण काकडे, दिपक देशमुख, गजानन वानखेडे, उत्तम डवले, रामराव देखमुख, महेंद्र खंडारे, अशोक लांडे, श्याम सरप, समाधान कटकवार, बाबूराव कटकवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# संत सिरोमणी रोहीदास जी महाराज यांची ६४७ वी जयंती साजरी...




जनसंचलन/ सिंदखेड राजा

किनगाव राजा येथे दिनांक २४ फेब्रुवारी रोजी किनगाव राजा येथील समस्त शिंगणे परीवारातर्फे संत शिरोमणी रोहीदासजी महारज यांची ६ ४७ वी जयंती साजरी करण्यात आली या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. ज्ञानेश्र नागरे तर प्रमुख पाहुणे म्हणुन किनगाव राजाचे ग्राम पंचायत सरपंच श्री प्रकाश मुंढे व ग्राम पंचायत सदस्य हे होते या वेळी संत शिरोमणी रोहीदास महाराज यांचे प्रतिमेचे पुजन करण्यात आले श्री भरत शिंगणे सर व श्री छगनराव शिगणे सर यांचे हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला . या वेळी ॲड. राजे निशिकांत जाधव यांनी संत शिरोमणी रोहीदास महाराज यांनी केलेले कार्य या बददल मोलाची माहीती सागितलीकार्यक्रमाला या वेळी मा . उप सरपंच श्री बि. डी साळवे श्री दिपक पडुळकर सौ प्रतिभा ताई राजे संचालक महीला समुपदेशक केद्र किनगाव राजा श्री अनिल गवरे . श्री उत्तमराव गवारे समस्त शिंगणे परीवार व गावातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्तीत होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री कारभारी शिंगणे यांनी केले तर आभार प्रदर्शन भरत शिंगणे यांनी केले

# भीम नगर वार्ड क्र २ येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अध्यक्षपदी उमेश हेलोडे यांची निवड

जनसंचलन/बुलढाणा

भीम नगर वार्ड क्रमांक २ बुलढाणा येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवाची समिती गठित करण्यात आलेले आहे.दि १८ फेब्रुवारी रोजी भीम नगर येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त नवीन कार्यकारणी गठीत करण्यात आली असून अध्यक्षपदी सर्वानुमते उमेश हेलोडे यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी हरी जुमडे, सचिव आकाश लोखंडे, सहसचिव महेश मोरे, कोषाध्यक्ष दादाराव डोंगरदिवे, सह कोषाध्यक्ष पवन डोंगरदिवे, तर सदस्य म्हणून राहुल इंगळे, सोहम सपकाळ,



यश वाघ शैलेश वानखेडे ऋषी जाधव कुणाल गायकवाड सुरज वाकोडे साहिल जाधव नितीन गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आलेली आहे

# जिल्हा सामान्य रुग्णालय येथे ५० घाटाच्या आरोग्य संस्थेचे बांधकामाचे डिजिटल भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार...

जनसंचलन/बुलडाणा

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे PMABHIM-critical care Block या ५० खाटांच्या आरोग्य संस्थेची बांधकामाची डिजिटल भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४:४५ वाजता राजकोट येथून ऑनलाईन होणार आहे. जिल्हा रुग्णालय बुलढाणा येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर मिशन अंतर्गत २३.७ कोटी रुपयांची अनुदान प्राप्त झाले असून त्या अंतर्गत क्रिटिकल केअर युनिट या इमारतीचे बांधकाम चा भूमिपूजन सोहळा कार्यक्रम जिल्हा रुग्णालयाच्या आवारात आयोजित केलेला






आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन ऑनलाईन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते राजकोट येथून होणार असून त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय राज्यपाल महोदय माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे तथा माननीय उपमुख्यमंत्री महोदय यांच्या ऑनलाइन उपस्थितीत भूमिपूजन सोहळा जिल्हा रुग्णालयाच्या आवारामध्ये आयोजित केलेला आहे याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय नामदार दिलीप वळसे पाटील हे उपस्थित राहणार असून त्यांच्याबरोबर जिल्ह्यातील खासदार तथा आमदार व प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहे.

# सहा देशी पिस्टलसह एक आरोपीस अटक सोनाळा पोलिसांची लाडणापूर रोडवर धडक कारवाई

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवरुन ज.जामोद तालुक्यातील टुनकी परिसरात देशी बनावटीच्या अग्नीशस्त्र (पिस्टल), काडतूस खरेदी होत असल्याच्या तक्रारी पोलिस विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर सोनाळा पोलिसांनी ॲक्शन मोडवर येत सोनाळा पोस्टे. हद्दीतील लाडणापूर येथे २३ फेब्रुवारी रोजी कारवाई करीत बावीस वर्षीय आरोपीच्या मुसक्या आवळीत त्याच्याकडून सहा देशी पिस्टलसह १ लाख ८४ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मध्यप्रदेश राज्याच्या सिमेवरील सोनाळा, तामगाव, जळगाव जामोद हद्दीतील टुनकी परिसरात देशी बनावटीचे अग्नीशस्त्र (पिस्टल)ची खरेदी विक्री होत असल्याच्या तक्रारी पोलिस विभागाकडे प्राप्त झाल्या होत्या. पिस्टल तस्करी करणाऱ्यांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलिस अधिक्षक सुनिल कडासणे, अपर पोलिस अधिक्षक अशोक थोरात, बी.बी.महामुनी यांनी पोलिसांना दिल्या होत्या. पोलिसांनी ॲक्शन मोडवर येत गोपनीय माहितीवरुन सोनाळा पोलिसांच्या पथकाने २३ फेब्रुवारी रोजी टुनक बु. ते लाडणापूर रोडवरील नदीच्या पुलाजवळ धडक कारवाई करीत आरोपी वसीम खान ईलीयास खान (वय २२) रा.सिंगार पुन्हाना, जिल्हा नुहू हरीयाणा याच्या मुसक्या आवळीत त्याच्याकडून सहा देशी पिस्टलसह १ लाख ८४ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीवर सोनाळा पोस्टे.ला भादंवीचे कलम ३/२५ अग्नी शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सपोनी.चंद्रकांत पाटील हे करीत आहेत. गंभीर गुन्ह्यातील इतर आरोपीतांच्या शोध घेण्यासाठी जिल्हा पोलिस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशा.पोलिस निरिक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात गुन्हा शाखेचे पथके तयार करण्यात आले असून पथक आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आले आहे. देशी बनावटीचे ६ अग्नीशस्त्र १ लाख ८० हजार, ७ पिस्टल मॅंझीन २ हजार, एक जिवंत काडतूस ५०० रुपये, एक मोबाईल ५०० रुपये, नगदी ११२० रुपये, बॅग २०० रुपये असा आरोपीकडून १ लाख ८४ हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक सुनिल कडासणे, अपर पोलिस अधिक्षक अशोक थोरात, बी.बी.महामुनी, मलकापूर उपविभागीय पोलिस अधिकारी डी.एस.गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सोनाळा पोस्टे.चे सहाय्यक पोलिस निरिक्षक चंद्रकांत पाटील, पोहेकॉं.विनोद शिंबरे, पोकॉं. राहुल पवार, चापोकॉं.शेख इम्रान शेख रहेमान यांच्या पथकाने केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अखेर जागावाटपाचा तिढा सुटला, महाविकास आघाडीतील हा पक्ष लढविणार कोल्हापूरची जागा...

वृत्तसंस्था/ कोल्हापूर

महाविकास आघाडी अंतर्गत कोल्हापूरची जागा काँग्रेसलाच सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच या पक्षाने पुढाकार घेऊन आघाडीतील सर्व मित्र पक्षांच्या नेत्याची बैठक घेतली आणि लोकसभा निवडणुकीची रणनीती आखली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांनी यामध्ये पुढाकार घेतल्याने ही जागा कुणाला मिळणार याबाबतची संभ्रम दूर झाला आहे.महाविकास आघाडी अंतर्गत कोल्हापूर लोकसभा जागेवर शिवसेना उद्धव ठाकरे गट, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेसनेही दावा केला आहे. दोन्ही खासदार शिवसेनेच्या चिन्हावर निवडून आल्याने या जागा आमच्याच आहेत असे ठाकरे गटाच्या वतीने सांगण्यात येते. गेले वीस वर्षे या जागेवर राष्ट्रवादी लढत असल्याने ही जागा आमचीच असल्याचे राष्ट्रवादीचे नेते सांगतात. तर या मतदारसंघात काँग्रेसचे पाच आमदार असल्याने ही जागा आम्हालाच मिळायला हवी असा आग्रह या पक्षाने धरला आहे. यामुळे ही जागा नेमकी कोणाला मिळणार याबाबत तर्कवितर्क लढवले जात आहेत.या सर्व काँग्रेसने पुढाकार घेऊन बैठक घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही जागा आता काँग्रेसलाच सुटल्याचे स्पष्ट झाले आहे. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांनी अप्रत्यक्षरीत्या उमेदवारी बाबत होकार दिल्याने काँग्रेसने लोकसभा निवडणुकीची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. जागा मिळणार हे निश्चित झाल्यानेच तातडीने आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांची काँग्रेस कमिटीत बैठक घेतली.या बैठकीस शिवसेना, राष्ट्रवादी, जनता दल, शेकाप, माकप, भाकप यासह या अनेक पक्षांचे नेते उपस्थित होते. लोकसभेची जागा जिंकण्यासाठी काय काय करता येईल, प्रचार कसा करता येईल यासंदर्भात सर्वांची मते जाणून घेण्यात आली. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सतेज पाटील यांनी पुढाकार घेऊन ही बैठक घेतली. ज्या अर्थी काँग्रेसने पुढाकार घेतला आहे याचा सरळ अर्थ ही जागा याच पक्षाला मिळाल्याचे स्पष्ट होते. या पक्षाकडे शाहू महाराजांच्या रूपाने मिळालेले सक्षम उमेदवार, तीन मतदारसंघात असलेली काँग्रेसची ताकद, सतेज पाटील यांची यंत्रणा आणि व्यूहरचना यामुळेच ही जागा काँग्रेसला सोडले असल्याचे बोलले जात आहे.या बैठकीस काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण,



राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष व्ही.बी. पाटील, शहराध्यक्ष आर. के. पोवार, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष संजय पवार, विजय देवणे, रविकिरण इंगवले, सुनील मोदी, संजय चौगुले, वैभव उगळे, शिवाजीराव परुळेकर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# देऊळगाव मही मध्ये खाजगी रुग्णालय संचालकाकडून अतिरिक्त फी घेणाऱ्या रुग्णालयाची चौकशी करून तात्काळ कारवाई करा

जनसंचलन/ देऊळगाव राजा

देऊळगाव राजा तालुक्यातील देऊळगाव मही मध्ये खाजगी रुग्णालय संचालकाकडून अतिरिक्त फी घेणाऱ्या रुग्णालया ची चौकशी करून तात्काळ कारवाई करा अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे नागरिकासह आमरण उपोषण करण्यात येईल अंढेरा प्रतिनिधी हनिफ शेख

देळगाव मही हे गाव राष्ट्रीय महामार्गावर असून तीस ते पस्तीस खेड्यात मुख्य बाजारपेठ असणारा गाव अशा गावाचे आसपास कितीतरी एक्सीडेंट केस होतात.अशा अवस्थेत ग्रामीण रुग्णालय देऊळगाव मही मध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रेफर करा म्हणतात अशा वेळेस पेशंटवर दुःखाचा संकट पसरून जातो की आता त्यांनी काय करावे खाजगी रुग्णालय रात्रीच्या वेळेस सगळे बंद असतात आपण आता जर का आपल्या पेशंटला हलवला ११० किलोमीटर अंतरावर जाय पर्यंत आपल्या पेशंटची काय अवस्था राहील.असा प्रश्न पेशंटच्या घरच्यासमोर निर्माण होतो . आणि अशावेळी देऊळगाव मही येथील खाजगी हॉस्पिटल रात्रीच्या सुमारास बंद असतात. दिनांक २१ फेब्रुवारी रोजी जिल्हा शल्य चिकित्सक रुग्णालय बुलढाणा व जिल्हा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याकडे अतिरिक्त फी घेणाऱ्या डॉक्टरांवर कार्यवाही करणेबाबत सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद इरफान मोहम्मद सादिक यांनी निवेदन दिले.

देऊळगाव मही मध्ये खाजगी रुग्णालय संचालकाकडून होणारी लूट थांबावी. व लॅब वाल्याची कमिशन ठरवून गरज नसताना विविध प्रकारच्या तपासण्या करायला लावणे. अशा डॉक्टर लोकांच्या वागणुकीमुळे रुग्णांना जीव गमवावा लागत असून त्यांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. तरी आपण याबाबत देऊळगाव मही येथील खाजगी रुग्णालयाची चौकशी करून या परिसरातील गोरगरीब जनतेला आर्थिक व मानसिक होणारा त्रास थांबावा.

आज रोजी विविध आजाराचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले असून त्यामध्ये हृदयविकार हा सर्वात मोठा आजार असल्याने कुठल्या वेळी कोणताही रुग्ण त्यांच्या रुग्णाला घेऊन गेले असता मोठ्या प्रमाणात त्यांची आर्थिक पिळवणूक करण्यात येत आहे. हा सर्व प्रकार शासनाच्या ध्येय धोरणाला अनुसरून नसून गोरगरीब जनतेच्या जीवित रक्षणासाठी असताना सुद्धा सदर रुग्णालयाची या परिसरातील सर्व सामान्य जनतेची आर्थिक पिळवणूक करत आहे. तरी आपण या प्रकरणी सदर रुग्णालयाच्या



संचालकाची प्रत्यक्ष भेट न घेता आपल्या कर्मचारी मार्फत चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. शेतमजूर वर्गाची एका प्रकारची लूट करत आहे.

ज्या डॉक्टर लोकांना २४ तास सेवा देण्याचा परवानगी भेटलेली आहे. अशा डॉक्टरांचे परवाने पाहून त्यांना रात्रीच्या वेळेस सेवा देण्याचे सांगावे किंवा योग्य ती कारवाई करण्यात यावी. काही डॉक्टर लोकांना तीन बेडची परवानगी असल्यास त्यांनी १५ ते २० बेड ठेवले आहे असा मनमानी कारभार देऊळगाव मही येथील खाजगी रुग्णालय मध्ये चालू आहे.

आपत्कालीन साधनांची जसे की फायर सिलेंडर प्रत्येक हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असला पाहिजे किंवा प्रत्येक वर्षी त्याचे नूतनीकरण करून घेणे अनिवार्य आहे. परंतु देऊळगाव मही येथील खाजगी रुग्णालयामध्ये अशा आपत्कालीन साधनांची पूर्तता होत नाही.अशाप्रकारे शासनाच्या नियमाचे उल्लंघन होत आहे.

# कला महाविद्यालय बुलढाणा येथे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




जनसंचलन/बुलढाणा

स्थानिक कला महाविद्यालय बुलढाणा येथे शुक्रवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. सुरेश बाठे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. नंदकिशोर अरुळकर तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे मुख्य लिपीक श्री अजय रिंढे , राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. विलास टाले हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवराच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विलास टाले यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी गाडगे बाबाची दशसूत्री सर्व उपस्थितांना समजावून सांगितली.

आपल्या अतिथीय मनोगतातून अजय रिंढे यांनी गाडगेबाबांचे विचार हे फक्त ऐकण्यासाठी नसून किंवा त्यांची जयंती ही फक्त फोटोला हार अर्पण करण्यापूर्ती मर्यादित न ठेवता सर्वांनी प्रामाणिकपणे त्यांचे जीवन कार्य व्यवस्थित नीट समजून घेऊन त्याप्रमाणे आपले आचरण करावे व गाडगेबाबा हे कृतीतून सिद्ध करावे अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ. नंदकिशोर अरुळकर यांनी संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छता उपक्रम व कीर्तन सेवा या विषयी उपस्थितांना संबोधित केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. सिद्धेश्वर नवलाखे, डॉ. आरती खडतकर, डॉ. माधुरी देशमुख, डॉ. मनोज व्यवहारे, डॉ. प्रवीण गहले, गजानन होणे, विनोद पिंपळे, अशोक सुरडकर व अमोल चाकोतकर इत्यादी महाविद्यालयीन कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे बहुसंख्य स्वयंसेवक स्वयंसेविका यांची उपस्थिती लाभली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विलास टाले तर आभार प्रदर्शन रासेयो महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. आरती खडतकर यांनी केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958